**मे. राजधीर वाईन प्रा. लि. यांच्या गट क्र.: २२/१/अ/१, २२/२, गावः भिलवाड, पोस्टः कापशी, तालुकाः देवळा, जिल्हाः नाशिक, महाराष्ट्र येथे ५ केएलडी स्पिरिट आणि ३० केएलडी वाईन उत्पादन करणाऱ्या, द्राक्ष वायनरीसह फळांवर आधारित डिस्टिलरी प्रकल्पाच्या प्रस्तावित उत्पादन युनिटसाठी दिनांकः ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्पाच्या ठिकाणी आयोजित सार्वजनिक सुनावणी सभेचे इतिवृत्त.**

---

मेसर्स राजधीर वाईन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रस्तावित फळ-आधारित डिस्टिलरी प्रकल्पासह द्राक्ष वायनरी उत्पादन युनिट, ज्यामध्ये ५ केएलडी स्पिरिट व ३० केएलडी वाईन उत्पादन प्रस्तावित असून या प्रकल्पाची पर्यावरणीय विषयक जाहीर जनसुनावणी दिनांक: ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता मेसर्स राजधीर वाईन प्रा. लि., गट क्रं. २२/१/अ/१, २२/२, गाव. भिलवाड पो. कापशी ता. देवळा, जि. नाशिक, महाराष्ट्र या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या मुख्य कार्यालय आदेश दिनांक: २१/०४/२०२६ नुसार पर्यावरणीय जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती. सदर जनसुनावणी दरम्यान समितीचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. श्री. कैलास कडलग, उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी चांदवड, उपविभाग चांदवड (अध्यक्ष)
२. श्री. विद्यासागर वि. किल्लेदार, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक (सदस्य)
३. श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक (समन्वयक)

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले आणि पर्यावरण जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीच्या कामकाजास सुरुवात केली. समन्वयकांनी नमूद केले की, आज आपण गट क्र. २२/१/अ/१, २२/२, गावः भिलवाड, पोस्टः कापशी, तालुकाः देवळा, जिल्हाः नाशिक, महाराष्ट्र येथील मे. राजधीर वाईन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या, ५ केएलडी स्पिरिट आणि ३० केएलडी वाईन उत्पादन करण्याच्या क्षमतेच्या, फळ-आधारित डिस्टिलरी प्रकल्पासह द्राक्ष वाईनरीच्या प्रस्तावित उत्पादन घटकाच्या पर्यावरण जनसुनावणीसाठी एकत्र जमलो आहोत.

या प्रकल्पाची पर्यावरण जनसुनावणी, भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने दिनांक: १४ सप्टेंबर २००६ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार आयोजित करण्यात आली असून, हा प्रकल्प 'ब' श्रेणीमध्ये समाविष्ट होतो. या श्रेणीतील प्रकल्पांसाठी भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून पर्यावरण मंजुरी मिळवणे

आवश्यक असते; आणि या प्रक्रियेचाच एक भाग म्हणून, जनसुनावणी घेणे अनिवार्य असते. या अनुषंगाने, माननीय जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या परवानगीने, आजची जनसुनावणी दिनांक: ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

नियमांनुसार, या पर्यावरण जनसुनावणीबाबतची सार्वजनिक सूचना ३० दिवस आधी, म्हणजेच दिनांक: ०७/०४/२०२६ रोजी 'सकाळ' आणि 'टाइम्स ऑफ इंडिया' या दैनंदिन वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. याव्यतिरिक्त, जिल्ह्यातील संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या वाचन व अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात आली होती.

ही माहिती पुस्तिका उपलब्ध असलेल्या ठिकाणांची यादी खालीलप्रमाणे आहे:

१. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
२. जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक
३. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -२४
४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉइंट इमारत, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं.०८, सायन सर्कल, सायन (पू.)
५. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्र्यंबक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक - ४२२ ००७
६. उपविभागीय अधिकारी कार्यालय, ता. देवळा, जि. नाशिक
७. तहसील कार्यालय, देवळा, जि. नाशिक
८. ग्रामपंचायत कार्यालय, सुभाषनगर, रामेश्वर, कापशी, वखारी, कापरी, भिलवाड, ता. देवळा, जि. नाशिक

तसेच, समन्वयकांनी नमूद केले की, प्रकल्पाशी संबंधित कोणत्याही सूचना किंवा आक्षेप सादर करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाशिक येथील उप-प्रादेशिक कार्यालयाला ई-मेलद्वारे किंवा छापील प्रतीद्वारे कोणत्याही लेखी सूचना प्राप्त झाल्या नाहीत. या बाबींची रीतसर नोंद घेण्यात आली असून त्या यासोबत जोडण्यात येत आहेत. उपस्थित नागरिकांना अशी माहिती देण्यात आली की, जर कोणालाही काही लेखी किंवा तोंडी आक्षेप, मते किंवा प्रश्न मांडायचे असतील, तर प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर ते तसे करू शकतात.

त्यानंतर, अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती सादर करण्याची विनंती करण्यात आली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार, मे. सदर्न एन्वायरो इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड, हैदराबाद यांच्या तर्फे श्री. राजेश मानकर यांनी प्रकल्पाच्या विविध पैलूंचा समावेश असलेले एक सर्वसमावेशक सादरीकरण केले. यामध्ये प्रकल्पाचा परिचय, पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन आणि जनसुनावणीचा उद्देश, प्रकल्पाचे स्थान, प्रकल्प स्थळाचा गुगल नकाशा, प्रकल्पाचा तपशील, प्रकल्पाची मांडणी, प्रकल्पाचा अभ्यास क्षेत्र, प्रकल्प स्थळाचे सद्यस्थितीतील छायाचित्रे, प्रस्तावित प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये, प्रस्तावित प्रकल्पासाठीच्या मूलभूत आवश्यकता, पर्यावरणीय आधारभूत स्थितीचा अभ्यास, स्थानिक पर्यावरणीय परिस्थिती आणि परिसराचा तपशील, अभ्यास क्षेत्राविषयी माहिती, अभ्यास क्षेत्रातील हवेच्या गुणवत्तेच्या निरीक्षणाचे निष्कर्ष, अभ्यास क्षेत्रातील ध्वनी पातळीच्या निरीक्षणाचे निष्कर्ष, अभ्यास क्षेत्रातील पाण्याच्या गुणवत्तेच्या निरीक्षणाचे निष्कर्ष, भूजल आणि पृष्ठभागावरील पाण्याच्या गुणवत्तेचे निष्कर्ष, अभ्यास क्षेत्रातील मृदेच्या गुणवत्तेबाबतचे निष्कर्ष, जैवविविधता आणि पर्यावरणीय अभ्यास, अभ्यास क्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण, सामाजिक-आर्थिक पर्यावरणाचे विश्लेषण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरणीय व्यवस्थापन योजना, पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास, पर्यावरणीय व्यवस्थापन कक्षाची माहिती, सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम, पर्यावरणीय व्यवस्थापनाचा खर्च इत्यादी बाबींचा समावेश होता. ही संपूर्ण माहिती एका 'सीडी' वर ध्वनिमुद्रित करण्यात आली असून, तिचा सारांश 'कार्यवृत्तांत' मध्ये दस्तऐवजीकृत करण्यात आला आहे.

प्रकल्प सल्लागारांनी पॉवरपॉईंट सादरीकरण पूर्ण केल्यानंतर, श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, यांनी उपस्थित नागरिकांना, आपले नाव आणि गावाचा उल्लेख करून, कोणतेही प्रश्न, सूचना, मते किंवा शंका मांडण्याची विनंती केली.

सार्वजनिक सुनावणीदरम्यान, नागरिकांनी प्रकल्पाबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले; प्रकल्पाच्या प्रतिनिधींनी/सल्लागारांनी त्या प्रश्नांची उत्तरे दिली, ज्यांचा तपशील खाली दिला आहे:

| अ. क्रं. | टिप्पण्या, आक्षेप, सूचना इ. सादर केलेल्या व्यक्तीचे नाव | प्रकल्प प्रतिनिधी / प्रकल्प सल्लागाराने दिलेली आश्वासने / प्रतिसाद |
|---|---|---|
| १. | **यशवंत आनंदा शिरसाठ**<br>**ग्रामस्थ, भिलवाड ता. देवळा, जि. नाशिक** | प्रकल्प सल्लागारांनी स्पष्ट केले की, प्रस्तावित प्रकल्पातून निर्माण होणारे सांडपाणी मुख्यतः “Spent Wash” स्वरूपाचे असेल. तथापि, हा प्रकल्प पारंपरिक डिस्टिलरी प्रकल्पांपेक्षा वेगळ्या प्रकारचा असून त्यामध्ये निर्माण होणाऱ्या |

| अ. क्रं. | टिप्पण्या, आक्षेप, सूचना इ. सादर केलेल्या व्यक्तीचे नाव | प्रकल्प प्रतिनिधी / प्रकल्प सल्लागाराने दिलेली आश्वासने / प्रतिसाद |
|---|---|---|
| | श्री. यशवंत आनंदा शिरसाठ यांनी प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या व्यवस्थापनाबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यांनी विचारणा केली की, प्रस्तावित स्पिरीट प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याची विल्हेवाट कशा प्रकारे लावली जाणार असून त्याचा परिसरातील पर्यावरणावर काही परिणाम होणार आहे का. | सांडपाण्यातील TDS चे प्रमाण तुलनेने कमी राहणार आहे.<br><br>सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्पामध्ये 110 KLD क्षमतेचा अत्याधुनिक Effluent Treatment Plant (ETP) प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर ETP मध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पुन्हा प्रकल्पामध्ये पुनर्वापरासाठी वापरण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.<br><br>प्रकल्पासाठी एकूण 150 KLD पाण्याची आवश्यकता असून त्यापैकी केवळ 20 KLD ताजे पाणी लागणार आहे. उर्वरित सुमारे 130 KLD पाणी हे ETP व Boiler प्रणालीमार्फत पुनर्वापरित पाण्याद्वारे भागविण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.<br><br>ETP मध्ये घन पदार्थ खाली बसविले जातील, वायू वेगळे केले जातील व उर्वरित प्रक्रिया केलेले पाणी शेतीसाठी उपयुक्त स्वरूपात वापरण्यात येईल, असे सांगण्यात आले. |
| २. | **श्री. दशरथ रामदास पुरकर**<br><br>**सुभाषनगर, ता. देवळा, जि. नाशिक**<br><br>श्री. दशरथ रामदास पुरकर यांनी सांगितले की, परिसरातील विद्यमान वायनरी | प्रकल्प प्रतिनिधींनी सांगितले की, गेल्या 20 वर्षांपासून कंपनी द्राक्षांपासून वाईन निर्मितीचे कार्य करीत असून प्रारंभी 25,000 लिटर क्षमतेपासून सुरुवात करून आता सुमारे 10 लाख लिटर उत्पादन क्षमता विकसित करण्यात आलेली आहे. |

| अ. क्रं. | टिप्पण्या, आक्षेप, सूचना इ. सादर केलेल्या व्यक्तीचे नाव | प्रकल्प प्रतिनिधी / प्रकल्प सल्लागाराने दिलेली आश्वासने / प्रतिसाद |
|---|---|---|
| | प्रकल्पामुळे आजपर्यंत कोणताही गंभीर त्रास झालेला नाही. तथापि, प्रस्तावित नवीन प्रकल्पामुळे पर्यावरणावर कोणतेही दुष्परिणाम होऊ नयेत यासाठी कंपनीने आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. | कंपनीमध्ये स्थानिक कामगारांना रोजगार देण्यात आलेला असून वाहतुकीसाठी परिसरातील स्थानिक वाहनांचा वापर करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प हा जागतिक स्तरावर वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून भारतात तसेच नाशिक जिल्ह्यात द्राक्ष, फळे आणि फुलांपासून स्पिरीट निर्मिती करणारा हा पहिलाच प्रकल्प असल्याचे नमूद करण्यात आले.<br><br>प्रकल्पामुळे पर्यावरणीय दुष्परिणाम होणार नाहीत याची पूर्ण काळजी घेतली जाईल असे आश्वासन देण्यात आले. |
| ३. | **श्री. विजय राजाराम जाधव**<br>**भिलवाड, ता. देवळा, जि. नाशिक**<br>श्री. विजय राजाराम जाधव यांनी प्रकल्पाचे स्वागत करताना सांगितले की, या प्रकल्पामुळे गावातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होणे हे गावाच्या विकासासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले | प्रकल्प प्रतिनिधींनी त्यांच्या सकारात्मक प्रतिक्रियेबद्दल आभार व्यक्त केले. |
| ४. | **श्री. मंगेश केदा आहेर**<br>**सरपंच, वाखारी, ता. देवळा, जि. नाशिक** | प्रकल्प प्रतिनिधींनी सांगितले की, कंपनीचे चेअरमन स्व. दादाजी सुखदेव पाटील यांनी विशेष प्रयत्न करून MSEB साठी जमीन उपलब्ध करून दिली. |

| अ. क्रं. | टिप्पण्या, आक्षेप, सूचना इ. सादर केलेल्या व्यक्तीचे नाव | प्रकल्प प्रतिनिधी / प्रकल्प सल्लागाराने दिलेली आश्वासने / प्रतिसाद |
|---|---|---|
| | श्री. मंगेश केदा आहेर यांनी नमूद केले की, प्रकल्पामुळे परिसरात रोजगार निर्मिती होणार असून कंपनीच्या प्रयत्नांमुळे परिसरात Sub-station उभारण्यात मदत झाली आहे. Sub-station सुरू झाल्यानंतर सौर पंपधारक शेतकऱ्यांना दिवसा व रात्री वीज उपलब्ध होऊ लागल्याने त्याचा शेतकऱ्यांना थेट फायदा झाल्याचे त्यांनी सांगितले. | तसेच Sub-station मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.<br><br>या उपक्रमामुळे गाव तसेच कंपनी दोघांनाही दीर्घकालीन फायदा झाल्याचे नमूद करण्यात आले. |
| ५. | **श्री. दिगंबर दौलत पुरकर**<br>**सुभाषनगर, ता. देवळा, जि. नाशिक**<br><br>श्री. दिगंबर पुरकर यांनी सांगितले की, परिसरातील बहुतांश लोक शेतीवर अवलंबून आहेत आणि परिसरात औद्योगिक विकास मर्यादित आहे. अशा परिस्थितीत कृषी आधारित उद्योग प्रकल्प उभारल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी स्थिर बाजारपेठ उपलब्ध होईल.<br><br>त्यांनी नमूद केले की, वायनरी द्राक्ष लागवडीस प्रोत्साहन मिळाल्यास वाहतूक खर्च कमी होईल व स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. तसेच, पूर्वी काही काळ सांडपाण्यामुळे त्रास जाणवत होता, परंतु भविष्यात कंपनीने योग्य काळजी घ्यावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. | प्रकल्प प्रतिनिधींनी स्पष्ट केले कि, पूर्वी आर्थिक मर्यादांमुळे अत्याधुनिक ETP उभारणे शक्य झाले नव्हते. तथापि, आता आधुनिक तंत्रज्ञानयुक्त ETP बसविण्यात आले असून सांडपाण्याचे 100% प्रक्रिया व पुनर्वापर करण्यात येणार आहे.<br><br>भविष्यात कोणताही पर्यावरणीय त्रास होणार नाही, याची हमी देण्यात आली. तसेच, फ्रान्समधील आंतरराष्ट्रीय स्तरावरील तंत्रज्ञानाचा अनुभव असलेले तज्ज्ञ या प्रकल्पाशी संबंधित असल्याचे सांगण्यात आले.<br><br>प्रकल्पासाठी लागणाऱ्या Uni Blanc, Table Green इत्यादी द्राक्ष वाणांच्या लागवडीसाठी स्थानिक शेतकऱ्यांसोबत करार शेती करण्याची तयारी दर्शविण्यात आली. सर्व खर्च वजा जाता शेतकऱ्यांना सुमारे ₹2 लाख प्रति एकर उत्पन्न मिळेल, अशा |

| अ. क्रं. | टिप्पण्या, आक्षेप, सूचना इ. सादर केलेल्या व्यक्तीचे नाव | प्रकल्प प्रतिनिधी / प्रकल्प सल्लागाराने दिलेली आश्वासने / प्रतिसाद |
|---|---|---|
| | | पद्धतीने बाजारभाव देण्याचा प्रयत्न केला जाईल असे नमूद करण्यात आले. |
| ६. | **श्री. विद्यासागर वि. किल्लेदार,**<br><br>**प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक (सदस्य)**<br><br>सदस्यांनी प्रकल्पासाठी आवश्यक असणारे 20 KLD ताजे पाणी कोठून उपलब्ध होणार याबाबत माहिती विचारली.<br><br>सदस्यांनी CER अंतर्गत प्रस्तावित 2% निधीची रक्कम व त्याचा उपयोग कसा केला जाणार याबाबत माहिती विचारली. | प्रकल्प प्रतिनिधींनी सांगितले की, पावसाच्या पाण्याची साठवणूक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. पावसाचे पाणी संकलित करून शेततळ्यात साठवले जाईल व त्याचा वर्षभर वापर करण्यात येईल.<br><br>प्रकल्प प्रतिनिधींनी सांगितले की, गावातील सार्वजनिक सुविधा व सामाजिक विकासासाठी हा निधी वापरण्यात येईल. वृक्षारोपण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शैक्षणिक सुविधा, शाळांना मदत तसेच इतर आवश्यक ग्रामविकास उपक्रमांसाठी निधी वापरण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले. |
| ७. | **श्री. विजय पगार**<br><br>**रामेश्वरी, ता. देवळा, जि. नाशिक**<br><br>श्री. विजय पगार यांनी सांगितले की, प्रस्तावित वायनरी प्रकल्प हा परिसरातील शेतकऱ्यांसाठी आदर्श प्रकल्प ठरेल. परिसरातील शेतकऱ्यांनी वायनरी द्राक्ष लागवडीकडे वळावे आणि प्रकल्पामुळे शेतकरी तसेच कंपनी दोघांनाही फायदा होईल, असे त्यांनी नमूद केले. | प्रकल्प प्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या सकारात्मक भूमिकेबद्दल आभार व्यक्त केले व शेतकऱ्यांनी दिलेल्या सूचनांची नोंद घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन दिले. |

| अ. क्रं. | टिप्पण्या, आक्षेप, सूचना इ. सादर केलेल्या व्यक्तीचे नाव | प्रकल्प प्रतिनिधी / प्रकल्प सल्लागाराने दिलेली आश्वासने / प्रतिसाद |
|---|---|---|
| | तसेच, शेतकऱ्यांच्या वतीने प्रकल्पास कोणतीही हरकत नसल्याचे सांगून प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात यावा, अशी मागणी केली. | |

सभा अध्यक्षांनी नमूद केले की, मे. राजधीर वाईन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीमध्ये प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. उपस्थित शेतकरी, ग्रामस्थ व नागरिकांनी प्रकल्पाबाबत आपली मते, सूचना, शंका व अपेक्षा मांडल्या असून त्यांची अधिकृत नोंद घेण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हा प्रशासनाच्या वतीने सदर लोकसुनावणीचा अहवाल राज्य शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले. उपस्थितांनी व्यक्त केलेल्या सूचना व मनोगताबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. शेवटी प्रशासन व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सभा अध्यक्षांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

श्री. प्रणव पाखले, उप-प्रादेशिक अधिकारी, यांनी अध्यक्ष महोदयांच्या मान्यतेने सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**श्री. प्रणव पाखले, (समन्वयक)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक**

**श्री. विद्यासागर वि. किल्लेदार,(सदस्य)**
**प्रादेशिक अधिकारी**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक**

**श्री. कैलास कडलग, (अध्यक्ष)**
**उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी चांदवड,**
**उपविभाग चांदवड**